परिवहन समितीच्या मंगळवार दि. १७/१०/२०१७ रोजी दुपारी ०२:०० वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

**उपस्थित सदस्य**

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| | मा. श्री. जितेंद्र धनराज कुकडे | सभापती |
| | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| | मा. सौ. उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| | मा. सौ. वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| | मा. श्री. नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य |
| | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| **1.** | मा. सौ. विद्या योगेश मडावी | सदस्या |
| **2.** | मा. श्री. नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| **3.** | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| **4.** | मा. सौ. मनिषा आशिष धावडे | सदस्या |

**अनुपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| | मा. श्री. प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| | मा. श्री. नितीश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य |
| | **श्री. संदीप चंद्रभान जाधव<br>सभापती स्थायी समिती – पदेन सदस्य** | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| | **श्री. शिवाजी जगताप** | परिवहन व्यवस्थापक |
| | **श्री. हरिष दुबे** | निगम सचिव |

मा.सभापती, यांनी परिवहन समितीच्या सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक २१**:– परिवहन विभागाकडे पुरेसा वाहतुक संबधी अनुभवी कर्मचारी वर्ग नसल्याने विभागाने सादर केलेल्या प्रस्तावाला अनुसरून –

अ) श्री. प्रविण सरोदे, तांत्रिक पर्यवेक्षक दि. ०१/१२/२०१६ ते दि. ३१/०५/२०१७ व दि. ०१/०६/२०१७ ते दि. ३०/०८/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेवुन यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

ब) श्री. सुकीर सोनटक्के, वाहतुक व्यवस्थापक यांना दि. ०१/१२/२०१६ ते दि. ३०/०५/२०१७ व १/०६/२०१७ ते दि. ३०/०८/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात येऊन दि. ०८/०९/२०१७ पासुन पुढील ६ महिन्यांकरिता मुदतवाढ देण्यात येत असुन माहे सप्टेबर २०१७ पासुन रु ३५,०००/— दरमाह एकमुस्त मासिक मानधन मंजुर करण्याचा प्रश्न विचारात घेऊन समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक २२:— परिवहन विभागाकडे लेखा विषयक कामकाज करण्याकरीता अनुभवी कर्मचारी वर्ग नसल्याने शासकीय वित्त व लेखा विभागातुन सेवानिवृत्त झालेले श्री. विनय भारद्वाज, सेवानिवृत्त अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीवर नियुक्ती करण्यात आलेली असून हयांना दि. ०७/१०/२०१६ ते दि. ०६/०४/२०१७ व दि. ०७/०४/२०१७ ते दि. ३१/०८/२०१७ पर्यंत व दि. ०८/०९/२०१७ पासुन पुढील ०६ महिन्याकरीता मुदतवाढ देण्यात येऊन माहे सप्टेबर २०१७ पासुन रू. २२,०००/— दरमाह एकमुस्त मासिक मानधन मंजुर करण्याचा प्रश्न विचारात घेवुन यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक २३:— परिवहन विभागाकडे पर्यवेक्षकीय कामकाज करण्याकरीता अनुभवी कर्मचारी वर्ग नसल्याने श्री. रामराव मातकर, अतांत्रिक पर्यवेक्षक यांना दि. ०१/१२/२०१६ ते दि. ३०/०५/२०१७ व दि. ०१/०६/२०१७ ते दि. ३०/०८/२०१७ व दि. ०८/०९/२०१७ पासुन पुढील ०६ महिन्याकरीता मुदतवाढ देण्यात येऊन माहे सप्टेबर २०१७ पासुन रू. २२,०००/— दरमाह हे वाढीव एकमुस्त मासिक मानधन मंजुर करण्याचा प्रश्न विचारात घेऊन यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक २४:— परिवहन विभागात शासन निर्णयाच्या अनुषंगाने सेवा करार पद्धतीने तीन पदे भरण्यासाठी थेट मुलाखात व प्रात्यक्षिक आयोजीत करण्यात आले होते. मुलाखतीअंती निवड समितीने गुणवत्तेस अनुसरुन थेट मुलाखातीतील निवड समितीच्या शिफारसीनुसार खालील अधिकारी/कर्मचारी यांची निवड करण्यात आली —

१. मनुष्यबळ विकास तथा प्रशासकीय अधिकारी म्हणून श्री. आर. आर. पागे
२. कार्यकारी/उपअभियंता (स्थापत्य) म्हणून श्री. के.आर. मिश्रा व
३. स्टेनोग्राफर म्हणून श्रीमती एस. के. ठोंबरे

परिवहन विभाग मनपाद्वारे दि.०१/०९/२०१७ पासून नियुक्ती देण्यास हरकत नाही अशी शिफारस निवड समितीने केली. त्या अनुषंगाने उपरोक्त तीन्ही अधिकारी/कर्मचा—यांना नियुक्ती देण्यात आली. शासन निर्णय क्र. २७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७/१२/२०१६, अन्वये निवड झालेल्या उमेदवारांचे नावास व मानधनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेऊन अनु क्र १ व २ वरील मनपातुन सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना शासन निर्णयप्रमाणे जे वेतन अनुज्ञेय राहील त्यास कमाल रु ४०,०००/— प्रत्येकी मासिक मानधन मर्यादा ठेऊन व अनु. क्र ३ वरील स्टेनोग्राफर यांना रु २०,०००/— एकमुस्त मासिक मानधन देण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक २५</u>**:— नागपूर महानगरपालिकेच्या ''आपली बस'' वाहतुकी अंतर्गत परिवहन विभागात आस्थापनेवर श्रम अधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी या पदावर प्रथम ०६ महिन्याचे कालावधी करीता श्री. अरूण अंतुरामजी पिपरूडे यांना व त्यांच्या मानधनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेऊन ते ज्या तारखेस विभागात रूजु झालेत त्या तारखेपासुन शासन निर्णय क्र. २७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७/१२/२०१६ प्रमाणे जे वेतन अनुज्ञेय राहील त्यास कमाल रु ४०,०००/— मासिक मानधनाची मर्यादा ठेवून यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक २६</u>**:— नागपूर महानगरपालिकेच्या ''आपली बस'' वाहतुकी अंतर्गत परिवहन विभागात आस्थापनेवर सहाय्यक लेखापाल या पदावर प्रथम ०६ महिन्याचे कालावधी करीता श्री. अश्विन प्रदिपराव पाचपोर यांना, सहाय्यक लेखापाल म्हणुन नियुक्त करण्याचा प्रश्न विचारात घेऊन ते ज्या तारखे पासुन परिवहन विभागात रूजु झालेत त्या तारखेपासुन त्यांना एकमुस्त रु २००००/— मानधन यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक २७</u>**:— परिवहन विभाग मनपाचे आर्थिक वर्ष २०१७—१८ मध्ये NMC The City of Nagpur Transport Fund, या बॅक ऑफ महाराष्ट्र च्या Current Account मध्ये माहे जुलै २०१७ ते सप्टेंबर २०१७ पर्यंत रु. १५,१६,००५८८/— हा एकूण तिकीट विक्रीचा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी माहे जुलै २०१७ ते सप्टेंबर २०१७ पर्यंत रु. २४,००,२८,३९८/— हा विविध लेखाशिर्षा अंतर्गत एकूण खर्च झाला आहे. या खर्चाचा लेखाजोखा परिवहन समिती समक्ष सादर करुन मान्यता प्राप्त करुन कार्योत्तर वित्तीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेऊन उपरोक्त ठरावास मा.सदस्य श्री.नितीन साठवणे यांनी विरोध दर्शविला व त्यास समितीने बहुमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक २८</u>**:— आजच्या सभेची कार्यवाही कायम करून ही सभा अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

| | |
|---|---|
| निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर | सभापती<br>परिवहन समिती<br>महानगरपालिका,नागपूर |